॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात भारतीय उद्योग महासंघ (Confederation of Indian Industry) अंतर्गत एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट करिअर लांउज हा उपक्रम राबविण्यात येणार असून आज यासंदर्भात इरादा पत्रावर (Letter of Intent) कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली.

हया करारामुळे शिक्षणापासून रोजगाराकडे विद्यार्थ्यांचा प्रवास सुनिश्चित होण्यास यासंदर्भात इरादा पत्रावर (Letter of Intent) कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरु प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ विनोद पाटील, केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे प्लेसमेंट समन्वयक प्रा. उज्वल पाटील, प्लेसमेंटचे उपसमन्वयक प्रा. रामेश्वर चव्हाण, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा व आंतरवासिता समन्वयक श्री. संदीपकुमार हे उपस्थित होते.

विद्यापीठात भारतीय उद्योग महासंघ अंतर्गत एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट करिअर लाउंज हा उपक्रम राबविण्यासाठी भारतीय उद्योग महासंघाचे कौशल्य विकास विभागाचे व्यवस्थापक प्रतिनिधी श्री गौरव मिश्रा यांनी दि. २ जुलै रोजी भेट देत विद्यापीठ परिसरात एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट करिअर लाउंज स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा आढावा घेतला.

एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट करिअर लांउज कार्यक्रमाचे प्राथमिक उद्दिष्ट विद्यार्थ्याना व्यावहारिक अनुभव, करिअर मार्गदर्शन आणि करिअर विकासाच्या संधी मिळतील याची खात्री करुन शिक्षण आणि उद्योग यातील अंतर भरून काढणे आहे. उद्योग तज्ञांनी तयार केलेल्या रोजगारक्षमता वाढिसाठी कार्यशाळा घेणे. प्लेसमेंट लिंक्ड प्रशिक्षण कार्यक्रम नवीनतम उद्योगातील मागणीनुसार कामाशी संबंधित शिक्षण संधी इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप आणि ऑन-जॉब-ट्रेनिंग सुविधा देणे. विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी मार्गदर्शन आणि करिअर प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे. इत्यादी कार्यक्रम एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट करिअर लांउज अंतर्गत राबविण्यात येणार आहेत.

..........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: ३ जुलै, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता